**D**

**SL. No. : W**

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 57 ]
Total No. of Questions : 57 ]

**CCE PR**
**REVISED & UN-REVISED**

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8
[ Total No. of Printed Pages : 8

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 85-M**

**Code No. : 85-M**

# ವಿಷಯ : ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ

# Subject : SOCIAL SCIENCE

**( ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ / Marathi Version )**

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ/ New Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Private Repeater )**

ದಿನಾಂಕ : 27. 06. 2018 ]
ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 9-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 12-45 ರವರೆಗೆ ]
ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 ]

[ Date : 27. 06. 2018
[ Time : 9-30 A.M. to 12-45 P.M.
[ Max. Marks : 100

**विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 57 प्रश्न आहेत.

2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.

3. बहूपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नांसाठी दिलेल्या सुचनांचे पालन करा.

4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

येथून कापा.

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
**प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.**

**Tear here**

I. प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशाला चार बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यापैकी एक पर्याय बरोबर आहे. बरोबर असलेला पर्याय निवडून त्याच्या इंग्रजी मुळाक्षरासह पूर्ण उत्तर दिलेल्या उत्तर पत्रिकेमध्ये लिहा : $10 \times 1 = 10$

1. सहाय्यक सैन्य पद्धतीची ओळख करुन देणारा ब्रिटीश गव्हर्नर

   (A) वॉरन हेस्टिंग (B) लॉर्ड वेलस्ली

   (C) लॉर्ड डलहौसी (D) लॉर्ड कॉर्नवॉलिस.

2. 6 ते 14 वयोगटातील सर्व मुलांना मोफत शिक्षण देण्यासाठी 2001 साली भारत सरकारने ही योजना आमलात आणली.

   (A) राष्ट्रीय साक्षरता अभियान (B) साक्षर भारत

   (C) सर्व शिक्षण अभियान (D) राष्ट्रीय प्रौढ शिक्षण.

3. **गट - A** मध्ये नेते आणि **गट - B** मध्ये त्यांचे देश दिलेले आहेत. योग्य जुळणारा गट ओळखा :

| **गट - A** | **गट - B** |
|---|---|
| (a) लेनिन | (i) चीन |
| (b) हिटलर | (ii) रशिया |
| (c) मुसोलिनी | (iii) जर्मनी |
| (d) माओ-त्से-तुंग | (iv) इटली. |

| | ***a*** | ***b*** | ***c*** | ***d*** |
|---|---|---|---|---|
| (A) | ii | iii | iv | i |
| (B) | i | ii | iii | iv |
| (C) | iv | i | ii | iii |
| (D) | iii | iv | i | ii. |

4. संयुक्त राष्ट्र संघटनेचे ( UNO ) मुख्य कार्यालय असलेले ठिकाण

   (A) न्युयॉर्क (B) पॅरिस


   (C) रोम (D) जिनेव्हा.

5. बाल मजुरीचे निर्मूलन भारतीय घटनेच्या या कलमाद्वारे केले जाते.

(A) कलम-21 (B) कमल-17

(C) कलम-52 (D) कलम-24.

6. नकाशात दर्शविलेल्या नैसर्गिक वनस्पतींच्या प्रकारांची योग्य जोडी लिहा.




(A) 1-मॅंग्रोव्ह अरण्ये, 2-वाळवंटी वनस्पती, 3-सदाहरित अरण्ये

(B) 1-सदाहरित अरण्ये, 2-मॅंग्रोव्ह अरण्ये, 3-वाळवंटी वनस्पती

(C) 1-मॅंग्रोव्ह अरण्ये, 2-हिमालयातील अल्पाईन अरण्ये, 3-सदाहरित अरण्ये

(D) 1-वाळवंटी वनस्पती, 2-सदाहरित अरण्ये, 3-मॅंग्रोव्ह अरण्ये.

7. भारताने आपली स्वतंत्र जी. पी. एस. ( GPS ) व्यवस्था घेण्यासाठी यशस्वीरित्या अवकाशात सोडलेल्या उपग्रहांची संख्या

(A) 3 (B) 5

(C) 6 (D) 7.

8. खालील परोक्ष कर हा आहे.

(A) उत्पन्न कर (B) आयात-निर्यात कर

(C) संपत्ती कर (D) कंपनी कर.

9. बँकांची बँक

(A) विजया बँक (B) कैनरा बँक

(C) भारतीय रिझर्व बँक (D) कार्पोरेशन बँक.

10. वर्गिस कुरियन याना धवल क्रांतीचे पितामह असे त्यानी संपादीत केलेल्या या साधनेसाठी म्हटले जाते.

(A) अपोलो हॉस्पीटलची स्थापना (B) जेट एअरवेजची स्थापना

(C) रिलायन्स उद्योगाची स्थापना (D) आमूल दूध डेअरीची स्थापना.

II. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : $14 \times 1 = 14$

11. सामान्य मानसाच्या इतिहासाबद्दल लिखान करणे हे इतिहासकाराला एक आव्हान आहे. का ?

12. हिटलरला हुकुमशहा बनण्यास जर्मनमधील उद्योगपतिंची कशी मदत झाली ?

13. जपानची कोणती चूक हिरोशिमा आणि नागासकीतील लोकांना आजही भोगावी लागत आहे ?

14. पाकिस्तान भारताशी सलोख्याचे संबंध राखण्यात अपयशी ठरला आहे. का ?

15. युनिसेफ ( UNICEF ) मुलांच्या विकासासाठो कसे जोरात प्रयत्न करीत आहे ?

16. कोणत्या साली 'समान वेतन कायदा' लागू करण्यात आला ?

17. स्त्री भ्रूण हत्येचा परिणाम कोणता ?

18. गंगेच्या त्रिभूज प्रदेशातील मँग्रोव्ह अरण्याना सुंदरबन असे का म्हणतात ?

19. भारताचे 'सिलिकॉन सीटी' असे बेंगळूरला का म्हणतात ?

20. जगात सर्वात प्रथम भौगोलिक माहिती व्यवस्थेचा ( GIS ) प्रारंभ कोणत्या ठिकाणी झाला ?

21. मुंबईला 'भारताचे मँचेस्टर' असे का म्हणतात ?

22. सर. एम. विश्वेश्वरय्याना 'भारताच्या आर्थिक योजनेचे पितामह' असे का म्हणतात ?

23. उत्पन्न-खर्च ( अंदाजपत्रक ) म्हणजे काय ?

24. फ्रेंच शब्द 'बँक' ( Banque ) याचा अर्थ काय ?

III. खालोल प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **दोन** ते **चार** वाक्यात लिहा : 25 × 2 = 50

25. '18 व्या शतकाचा पूर्वार्ध हा मुगल साम्राज्याच्या पतनाचा काळ होता.' या विधानाचे समर्थन करा.

26. मद्रासच्या शांततेच्या तहावर इंग्रजाना स्वाक्षरी करावी लागली. का ?

27. भारताच्या इतिहासात 19 व्या शतकाला 'पुनरुज्जीवनाचा कालखंड' असे म्हणतात. का ?

28. जुनागड संस्थान भारतात कसे सामील झाले ?

**किंवा**

पोर्तुगीजांच्या ताब्यातून गोवा कसा मुक्त झाला ?

29. भारतात प्रांतीयवादाच्या सहज वाढीसाठी कोणते घटक कारणीभूत आहेत ?

30. जगात भारत एक प्रभावशाली राष्ट्र आहे. कसे ?

31. "अलीकडे भारतातील अस्पश्यता नाहोशी होत आहे." या विधानाचे समर्थन करा.

32. पश्चिम किनारपट्टीचो मैदाने ही पूर्व किनारपट्टीच्या मैदानापेक्षा कशी वेगळी आहेत ?

33. भारताच्या हवामानावर परिणाम करणारे घटक सांगा.

34. मातीची धूप होण्यास कारणीभूत असणाऱ्या घटकांची यादी करा.

35. "भारतीय शेती ही द्वितीय आणि तृतीय व्यवसायाचे पालनपोषण करते." या विधानाचे समर्थन करा.

36. भूपात किंवा जमीन कोसळण्याचे परिणाम कोणते ?

37. "लोकसंख्या स्फोटाने अनेक समस्या निर्माण होतात." या विधानाचे समर्थन करा.

38. फक्त राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई उत्पन्न हे देशाच्या विकासाचे योग्य मोजमाप होत नाही. का ?

39. जागतिकीकरण हे आर्थिक वाढीचा पुरस्कार करते. कसे ?

40. खलाशाना समुद्र प्रवास करण्यास कोणत्या नवीन वैज्ञानिक उपकरनांनी मदत केली ?

41. हैद्राबाद कर्नाटक प्रदेशांची नांवे सांगा.

42. जातीयवादाचे परिणाम सांगा.

43. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या ( UNO ) मुख्य शाखा कोणत्या आहेत ?

44. बाल मजुरीची कारणे कोणती आहेत ?

45. भारतात आढळणाऱ्या मातीचे प्रमुख प्रकार कोणते आहेत ?

46. भारतात वाढविलेल्या फुलांची नांवे सांगा.

47. पाणी पुरवठ्याचे प्रकार कोणते आहेत ?

48. अविकशीत देशांची लक्षणे कोणकोणती ?

49. बँक खात्याचे प्रकार कोणते आहेत ?

IV. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **सहा (6)** वाक्यात लिहा : $6 \times 3 = 18$

50. 1857 च्या बंडाच्या अपयशाची कारणे स्पष्ट करा.

**किंवा**

शिक्षण आणि वृत्तपत्राचा विकास हा भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा मार्ग बनला. याचे वर्णन करा.

51. ''अपेक्षित निकाल साधण्यास भारत आणि चीन यांच्यातील संबंध अपयशी ठरला.'' या विधानाचे स्पष्टीकरण करा.

**किंवा**

''दहशतवाद हा एक अनैतीक आणि समाजद्रोही कृत्य बनला आहे.'' या वाक्याचे स्पष्टीकरण करा.

52. बेरोजगारी ही एक अत्यंत गंभीर सामाजिक समस्या आहे. विवरण करा.

**किंवा**

महिलांच्या सबलीकरणास महिला स्व-सहाय्य संघाची भूमिका स्पष्ट करा.

53. शक्ती साधनांच्या उणिवांची भरपाई करण्यासाठी कोणकोणत्या उपाय योजना हाती घेण्यात आल्या आहेत ?

**किंवा**

रस्ते वाहतूकीच्या समस्या कोणत्या आहेत ?

54. पंच वार्षिक योजना या भारताच्या आर्थिक विकासामध्ये महत्वाची भूमिका बजावितात. कसे ?

**किंवा**

ग्रामीण विकासात पंचायतराज संस्था महत्वाची भूमिका बजाविते. कसे ?

55. विमा कंपनींच्या फायद्यांची यादी करा.

**किंवा**

उद्योजकांच्या वैशिष्ट्यांची यादी बनवा.

V. खालील प्रश्नाचे **आठ (8)** ते **दहा (10)** वाक्यात उत्तर लिहा : 4

56. स्वातंत्र्य भारताच्या विकासासाठी जवाहरलाल नेहरू यांच्या योगदानाचे वर्णन करा.

VI. 57. भारताचा नकाशा काढा आणि खालील ठिकाणे दाखवा : $1 + 3 = 4$

a) $23\frac{1^\circ}{2}$ उत्तर अक्षांश

b) नागार्जून सागर योजना

c) कोची.

**अंध विद्यार्थ्यांकरिता पर्यायी प्रश्न : ( प्रश्न संख्या 57 च्या ऐवजी )**

भारतीयांच्या जीवनात हिमालयाचे उपयोग कोणते ? 4